IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

# समाज सुधारणा चळवळीतील महात्मा ज्योतिबा फुलेंचे योगदान: एक अभ्यास

**डॉ मारोती गणपती लोणे**

इतिहास विभाग प्रमुख

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, उरण, रायगड

**गोषवारा:** महात्मा ज्योतिबा फुले म्हणजे भारतीय समाजातील उत्थान, शिक्षण, विद्याप्रदान, आर्थिक समावेश, औद्योगिकीकरण, आणि समाजातील अन्यायाविरुद्ध लढण्यात महत्वाचे भूमिका निभावली. त्यांच्या योगदानाने सामाजिक अन्यायाचा विरोध करण्यात महत्वपूर्ण भूमिका त्यांनी निभावलेली आहे. त्यांच्या संघर्षामुळे भारतीय समाजात विविध अत्याचारांविरुद्ध लढण्यात मदत मिळाली. त्यांच्या उपक्रमांमध्ये स्त्रीवाद, जातिवाद, आर्थिक न्याय, आणि शिक्षणाचे मुद्दे समाविष्ट आहेत. फुले यांचे काम आजही भारतीय समाजात सामाजिक अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यात महत्वाचे आहे. महात्मा फुलेंनी सामाजिक परिवर्तनासाठी अहोरात्र कष्ट घेतले. विविध संस्था संघटना स्थापन त्यांनी अस्पृश्य आणि स्त्रियांच्या उद्धाराचे कार्यक्रम समाज परिवर्तनाला एक वेगळी दिशा दिली.

**बीज शब्द:** समाजसुधारणा, विविध संस्थांची स्थापना, शिक्षण, सत्यशोधक समाज,

**उद्दिष्टे:**

**संशोधन पद्धती:** वरील संशोधन पेपर तयार करताना मुख्यत्वे दुय्यम स्त्रोताचा वापर केला गेला आहे, त्यामध्ये ऑनलाइन वेबसाईटस, संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख, वर्तमानपत्रे इत्यादींचा समावेश आहे.

१) महात्मा ज्योतिबा फुले यांचे सामाजिक कार्यावर प्रकाश टाकने.

२) स्त्री व शूद्राती शूद्र यांच्या सुधारणा चळवळीतून सामाजिक परिवर्तनावर प्रकाश टाकने.

**प्रस्तावना:** महात्मा जोतीबा फुले यांनी आपले व्यक्तिमत्त्व स्वयंप्रेरणेने आणि आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनी घडविले होते. त्यांचा पिंड हा कृतिशील क्रांतिकारकाचा होता. महाराष्ट्राच्या समाजसेवेसाठी ध्येयाने भारावून जाऊन सर्व जीवन समर्पित करणारे ते थोर पुरुष होते. आधुनिक भारतातले पहिले समाजक्रांतिकारक म्हणजे महात्मा फुले होत. कारण ते सामान्यांतील असले तरी विचाराने व कर्तृत्वाने असामान्य होते. सामाजिक विषमतेविरुद्ध जोतीबांनी बंड पुकारले. समतेसाठी त्यांनी शुद्रातिशूद्रांना संघटित करण्याचे प्रयत्न केले. "शिक्षण व समता" या दोन शब्दांत त्यांच्या कार्याचे यथोचित वर्णन करता येईल. ते नुसते बोलघेवडे सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी अविरत झगडणारे ते ऋषी होते. महाराष्ट्रातील सर्वसामान्यांसाठी रात्रंदिवस झटणारे ते सेवक होते. त्यासाठी त्यांनी वेगवेगळे उपक्रमही हाती घेतले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रयोगप्रवण व विकसनशील होते. ग्रंथपांडित्यापेक्षा समाज प्रवाहातील भल्याबुऱ्या प्रवृत्तींचा अन्वयार्थ लावण्याचा त्यांनी प्रयत्न केला. प्रत्येक बाबीच्या मुळाशी जाऊन चिंतनशीलपणे त्यावर ते विचार करीत असत. त्यामुळेच त्यांना "महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर" म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे अग्रणी म्हणूनही त्यांना ओळखले जाते. महाराष्ट्राच्या

सामाजिक प्रबोधनाला त्यांनी वेगळी दिशा दाखविली. स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या उद्धारासाठी ते चंदनासारखे झिजले. त्यांच्या या कार्यात अनेकांनी विघ्ने आणण्याचा प्रयत्न केला. हाल अपेष्टा सहन केल्या, परंतु आपल्या ध्येयापासून जोतीबा फुले कधीच विचलित झाले नाहीत. इंग्रजांची सत्ता महाराष्ट्रात स्थिर होऊ लागली. त्याचबरोबर सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनेही होऊ लागली होती. शिक्षणाचा प्रसार होऊ लागला होता. परंतु तो ठराविक वर्गापुरताच मर्यादित होता. समाजातील तोच वर्ग आर्थिक प्रगतीकडे वाटचाल करू लागला होता. मात्र बहुजन समाज हा आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत मागासलेलाच राहिला.[१] सामाजिक परिवर्तन करण्यासाठी अस्पृश्य व स्त्रियांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी सर्वप्रथम त्यांनी आपल्या घरापासून सुरुवात केली आपल्या पत्नीला त्यांनी शिकवून शिक्षिका केले, विधवा पुनर्विवाह, बालहत्या प्रतिबंधक गृह अंधश्रद्धेतून सुटका होण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना, शेतकऱ्यांची दैन्य अवस्था, ग्रंथसंपदा लिहून समाजातल्या विविध घटकांचे कसे शोषण होते व त्यातून मुक्तीचा मार्ग त्यांनी सांगितलेला आहे.

महात्मा फुलेचे पूर्व चरित्र:

११ एप्रिल १८२७ - २८ नोव्हेंबर १८९० स्त्रीशिक्षण आणि त्याचबरोबर सामाजिक सुधारणांच्या विविध क्षेत्रांत कार्य करून पुरोगामी विचारांचे दान देणाऱ्या मार्क्सच्या जोतिराव फुले यांचा जन्म सातारा जिल्ह्यातल्या कटगूण या छोट्याशा गावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. जोतिरावांना राजाराम नावाचा एक भाऊ होता. जोतिराव एक वर्षाचे असतानाच त्यांच्या आईचे म्हणजेच चिमणाबाई यांचे निधन झाले. त्यामुळे जोतिरावांची मानलेली आत्या सगुणाबाई यांनी जोतिरावांचा सांभाळ केला. जोतिराव सात वर्षांचे असताना त्यांचे प्राथमिक शिक्षण सुरू झाले. पण चार वर्षांचा शालेय अभ्यासक्रम पूर्ण होण्याअगोदरच त्यांच्या शिक्षणात खंड पडला आणि ते घरातील भाजीविक्रीचा व्यवसाय करायला लागले. त्यावेळच्या पद्धतीनुसार इ.स. १८४० साली नारगावच्या खंडोबा नेवसे पाटील यांच्या सावित्रीबाई नावाच्या कन्येशी त्यांचा विवाह झाला. १८४१मध्ये जोतिराव पुन्हा स्कॉटिश मिशनच्या शाळेत जाऊ लागले. तिथे त्यांना उच्चवर्णीय मुलांचा सहवास मिळाला. इंग्रजी शिक्षणामुळे जोतिरावांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. हे शिक्षण घेत असतानाच त्यांना सदाशिव गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर, सखाराम यशवंत परांजपे हे मित्र भेटले.लहानपणी सगुणाबाई यांनी जोतिरावांच्या मनावर मानवतावादाचे संस्कार केले होते. गोरगरिबांची सेवा करण्यातच परमेश्वर सेवा आहे हे सूत्र सगुणाबाईंनीच त्यांच्या मनावर बिंबवले. विद्यार्थि दशेत असताना ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या समर्पित जीवनाचा व कार्यपद्धतीचा प्रभावही जोतिरावांवर पडला होता. इंग्रजी शिक्षणामुळे जोतिरावांनी डोळसपणे उदारमतवादी इंग्रज विचारवंतांच्या ग्रंथांचेही वाचन सुरू केले होते. या वाचनातून थॉमस पेन यांच्या 'जस्टिस ऑफ ह्युमॅनिटी', 'कॉमन सेन्स', 'राइट्स ऑफ मॅन' आणि 'एज ऑफ रिजन' या ग्रंथांचा जोतिरावांवर खूप प्रभाव होता. सर्वांशी समानतेने वागण्याचे घरातले संस्कार, ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे आचरण आणि थॉमस पेनच्या ग्रंथांचा प्रभाव यामुळे जोतिरावांच्या मनात आपल्या समाजातल्या विषमतेबद्दलचे बंड जागृत झाले. तत्कालीन समाजातील अनिष्ट चालीरितींविरुद्ध ते चिकित्सकपणे विचार करायला लागले. आपल्या समाजातील रूढी, परंपरा आणि जातिव्यवस्था अन्यायकारक आहेत, याचा अनुभव ते वेगवेगळ्या प्रसंगी घेत होते. हा अन्याय दूर करण्यासाठी शिक्षण' हा एकमेव उपाय आहे हेही त्यांना जाणवले.[२] एकंदरीत बालपणीच त्यांना भारतीय समाज व्यवस्थेविषयी आधारित आहे हे दिसून आले होते.

समाज परिवर्तन करण्याचे कार्य:

१. स्त्री उद्धाराचे कार्य : जोतीबा फुले यांनी समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी फार मोठे प्रयत्न केले. त्यावेळच्या समाजात विषमता, जातिभेद, अज्ञान, स्त्रीदास्य यांसारख्या अनिष्ट प्रथा केवळ धर्मामुळे दृढमूल झाल्या आहेत असे त्यांचे स्पष्ट मत होते.

त्यांनी सर्व बाबींचा विचार करून प्रथम स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले. हिंदू स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावयाचे ठरविले, भारतीय समाजाने स्त्रियांना समतेपासून व शिक्षणापासून वंचित ठेवले होते. व्यक्तीचे जीवन विकसित करण्यासाठी शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे असे जोतिबांचे मत होते. शिक्षणामुळे मनुष्यात स्वाभिमान निर्माण होतो. सत्य-असत्याचा उलगडा होतो. म्हणून शिक्षण हे सर्व सुधारणांचे मूळ आहे असे त्यांचे मत होते.[३] 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' या तत्त्वाचे ते पाईक होते. मुलांच्या कर्तव्याचे मार्गदर्शन मातेकडून होत असते. कर्तव्याची जाणीव झाली तरच देशाची प्रगती होते या विचाराचे ते होते.

स्त्री शिक्षण: स्त्रियांना शिक्षण देणे अतिशय महत्त्वाचे होते त्याशिवाय त्यांची दास्यत्वातून मुक्तता होणार नाही हे त्यांना चांगली माहिती होते म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. सनातन्यांच्या मते स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाही. त्यांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म व समाज यांच्या विरुद्ध वर्तन करणे होय. स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे भ्रष्टाचार करणे असे मानले जात होते. स्त्रीला शिक्षण दिले तर स्त्री कुमार्गाला लागेल आणि घरच्या सुखात अडसर येईल. मुलींनी शिक्षण घेतले तर तिला अकाली वैधव्य येईल, अशी खुळी समजूत समाजात रूढ होती. समाजाने अनेक बंधनांनी स्त्रियांना जखडून ठेवले होते., जोतिबांनी स्त्रीशिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंध, केशवपन यांसारख्या महत्त्वाच्या सामाजिक समस्येबाबत भरीव कार्य केले.[४] शिक्षणाचे महत्त्व प्रतिपादन करत असताना शूद्र व शेतकऱ्याचा दैन्य व्यवस्थेला शिक्षणाचा अभाव एकमेव कारण आहे हे त्यांनी आग्रहाने मांडले ते सांगतात."विद्येविना मति गेली, मतीबिना नीति गेली, नीतीविना गती गेली! गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले".[५] म्हणून शिक्षण घेऊन आपला उद्धार केला पाहिजे असे त्यांचे विचार होते.स्त्रियांनी शिक्षण घेतल्याशिवाय स्त्रींचा उद्धार होणार नाही हे त्यांना चांगले माहीत होते व तसेच सनातन्यांच्या आक्षेपांना प्रत्युत्तर देण्यासाठी जोतिबांनी प्रथम शिक्षणाची अपरिहार्यता जाणवल्यामुळे स्त्रियांना आणि शूद्रांना शिक्षण देण्याचा त्यांनी निश्चय केला. याच निश्चयामुळे ३ जुलै १८४८ रोजी जोतिरावांनी पुण्यातल्या भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. एवढेच नव्हे तर मुलींच्या शाळेत शिकवण्यासाठी स्त्रीशिक्षिका मिळत नसल्याने जोतिरावांनी आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिक्षण दिले आणि अध्यापिका केले. पण एका स्त्रीने स्त्रियांना शिकवण्यासाठी बाहेर पडणे जुनाट बुरसटलेल्या विचारांच्या लोकांना मान्य नव्हते. त्यांनी सावित्रीबाईंना आणि जोतिरावांच्या आईवडिलांनाही त्रास द्यायला सुरुवात केली. आपल्या कुटुंबियांना त्रास होऊ नये म्हणून जोतिरावांनी आपल्या घराचा त्याग केला. अस्पृश्यांसाठीही शिक्षणाची सोय व्हावी म्हणून जोतिरावांनी १८५१मध्ये पहिली शाळा पुण्यात नाना पेठेत सुरू केली. या शाळेला कर्मठ लोकांनी प्रचंड विरोध करून ही शाळा बंद पाडली तरी फुले यांनी हार मानली नाही आणि १८५२मध्ये पुण्यातल्या वेताळपेठेत सदाशिवराव गोवंडे यांच्या वाड्यात पुन्हा एकदा अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केली, समानतेसाठी शिक्षण देण्याच्या या ध्यासातून त्यांनी एकूण सतरा शाळा सुरू केल्या. जोतिबा फुले यांच्या या कार्याची दखल घेऊन इंग्रज सरकारने मेजर कँडी यांच्या अध्यक्षतेखाली जोतिराव फुले यांचा १६ नोव्हेंबर १८५२ रोजी सत्कार केला.[६]

हंटर आयोगाला सादर केलेले निवेदन:

हंटर शिक्षण आयोगापुढे १९ ऑक्टोबर १८८२ रोजी जोतीराव फुल्यांनी सादर केलेल्या निवेदनाचा संदर्भ व त्याचे महत्त्व लक्षात येण्यासाठी खालील ऐतिहासिक पार्श्वभूमीचे अवधान ठेवणे उपयुक्त ठरेल. लॉर्ड रिपन या उदारमतवादी व्हाईसरॉयच्या कारकीर्दीत त्याने सर विल्यम हंटरच्या अध्यक्षतेखाली एक शिक्षण आयोग नेमला. त्यात अध्यक्षाखेरीज २० सभासद होते आणि त्यांपैकी ८ सभासद भारतीय होते. या आयोगाने वूडच्या खालित्यातील मुख्य सूत्रांचा पुनरुच्चार केला. मात्र प्राथमिक शिक्षणावर जास्त भर द्यावा आणि ते मागासलेल्या तसेच आदिवासी जाती-जमातींना द्यावे अशी शिफारस केली. महात्मा फुल्यांनी सादर केलेल्या

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

निवेदनात "किमान १२ वर्षे वयापर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे" असे सुचविले होते. हंटर आयोगाने मात्र "प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे" अशी शिफारस केलेली नाही. लोकल सेस फंडापैकी निम्याहून अधिक भाग प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करावा, प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी, त्यांना प्रांतिक सरकारांनी भरघोस अनुदान द्यावे, नगरपालिकांनी प्राथमिक शाळांवर होणाऱ्या सर्व खर्चाची जबाबदारी घ्यावी, प्राथमिक शाळांचा कारभार मात्र शिक्षण खात्याच्या देखरेखीखाली चालावा, प्राथमिक शाळांतील शिक्षक प्रशिक्षित असावेत अशा अनेक महत्त्वाच्या सूचना जोतीरावांनी केल्या होत्या. हंटर आयोगाने त्या सर्व जशाच्या तशा स्वीकारल्या नाहीत. आयोगाच्या अहवालाचा मसुदा इंटरसाहेबांनी तयार केला असला तरी त्यात सुधारणा करणाऱ्या समितीने इतके बदल केले की, आयोगाचा प्रकाशित झालेला अहवाल वाचणे कंटाळवाणे होईल असे खुद्द हंटरसाहेबांनीच एका खाजगी पत्रात भाकित केले आनि आपण लिहिलेल्या भागाची मांडणी अशी रीतीने करण्यात आली आहे की, त्यात आपले असे काही राहिलेले नाही" अशी कबुलीही त्यांनी दिली. हंटर शिक्षण आयोगाच्या शिफारशी फुल्यांना समाधानकारक वाटल्या नाहीत. १८११ साली प्रसिद्ध झालेल्या "सार्वजनिक सत्य धर्म" पुस्तकात तर जोतीरावांनी "हिंदूतील आर्य ब्राह्मणखेरीजकरून शूद्रादि अतिशूद्र, भिल्ल, कोळी वगैरे लोकांविषयी बिलकूल ज्ञान नाही म्हणून ते तसा वाचाळपणा करीत आहेत" अशी हंटरसाहेबांवर परखड शब्दात टीका केलेली आढळते.[७]

विधवा पुनर्विवाह: स्त्रियांच्या शिक्षणाबरोबर विधवाविवाह, बालविधवांचे विदारक आयुष्य, केशवपन, बालविधवांवर होणाऱ्या अत्याचारांतून निर्माण होणाऱ्या बालहत्यांना प्रतिबंध अशा अनेक सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी जोतिरावांनी स्वतःचे आयुष्य पणाला लावले.पुरुषांना कितीही विवाह करण्याची सोय आणि स्त्रियांनी मात्र पतीचे निधन झाले तर आजन्म विधवेचे अन्यायकारक जीवन जगायचे ही गोष्ट फुले यांच्या संवेदनशील मनाला खूप त्रास द्यायची विधवांना चांगले जीवन जगता यावे म्हणून महात्मा ज्योतिबा फुले यांनी पुनर्विवाहाचा धडाडीने पुरस्कार केला त्यांनी १८६४ मध्ये पुण्यातील गोखले यांच्या बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला.[८] या कृतीतून हिंदवींच्या जीवनाविषयी किती कळकळ होती हे आपल्याला दिसून येते.

बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना: त्यावेळी बालपणी विवाह होत असल्याने बालविधवांचे प्रमाण अधिक होते. या बालविधवांचा अनेक स्वार्थी पुरुष गैरफायदा घ्यायचे आणि त्यातून झालेल्या गर्भधारणेमुळे स्त्रियांनाच बदनामी सहन करावी लागायची. ही बदनामी टाळण्यासाठी नवजात बालकाची हत्या केली जात असे किंवा त्यांना फेकून दिले जात असे. या महिलांसाठी जोतिरावांनी १८५२मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. अशा स्त्रियांचे सुरक्षितपणे बाळंतपण करण्याची आणि गुप्तता राखण्याची हमीही जोतिरावांनी दिली होती. याच बालहत्या प्रतिबंधक गृहात १८६५ मध्ये काशीबाई ही स्त्री प्रसूत झाली. तिच्या मुलाला १८७९मध्ये जोतिरावांनी दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले. जोतिरावांनी स्वतःला मूलबाळ नसूनही दुसरे लग्न करता मूल दत्तक घेऊन नवा आदर्श निर्माण केला. [९] ज्योतिबांनी सुरू केलेले बालहत्या प्रतिबंधक गृह ही भारतातील पहिलेच होते. यावरून त्यांची दूरदृष्टी कशी होती याची कल्पना येते. या संस्थेची उपयुक्त पटल्यावर पंढरपूर येथे बालहत्या प्रतिबंधक गृह उघडण्यात आले. चुकून पाऊल पडलेले स्त्रियांच्या जीवनामध्ये यामुळे आधार मिळाला.

केशवपन व सतीप्रथेस विरोध: केशवपन ही अनिष्ट प्रथा बंद व्हावी म्हणून महात्मा फुले यांनी न्हाव्यांच्या सभा घेऊन त्यांना आव्हान केले की, असले अमानुष नीच काम तुम्ही करू न्याय नका. त्या आपल्या आया-बहिणी आहेत असे समजून त्यांच्या केसावर वस्तरे चालवून पहा, तुमचा हात चालणार नाही. त्यांच्या या आव्हानास प्रतिसाद देऊन न्हाव्यांनी खरोखर संप करून केशवपनाच्या कामावर बहिष्कार टाकला. एखाद्या स्त्रीचा नवरा ज्यावेळेस मृत होतो. त्यावेळी तिला अनेक संकटे सोसावी लागतात. तिला आयुष्यभर वैधव्यात रहावे लागते. पुर्वी सती जात असत परंतु पुरूषाला पत्नी निधनाचे दुःख होऊन सता गेलेला

ऐकलं आहे काय? असा प्रश्न उपस्थित करून महात्मा फुले यांनी सतीच्या अनिष्ट चालीवर कोरडे ओढलेले आहेत.[१०] महाराष्ट्रातील उच्च जातीचे सती प्रथा काही अंशी चालू होती त्यासाठी प्रतीला महात्मा फुलेंनी विरोध केला.

अस्पृश्य उध्दाराचे कार्य :- अस्पृश्यता ही वंशपरंपरेने चालत आलेली अत्यंत वाईट प्रथा होती. १९ व्या शतकात ती तीव्र होती. उच्चवर्णियांकडून अस्पृश्यांना अत्यंत हीन वागणूक दिली जात होती. समाजजीवनात त्यांना कोणतेही स्थान नव्हते. अस्पृश्यांना गावाच्या बाहेर राहावे लागे. दारिद्र्यातच त्यांचा जन्म होई व त्यातच त्यांचा अंत होई. स्पृश्य-अस्पृश्यांना शिवून घेत नसत. गावातून सकाळी व संध्याकाळी अस्पृश्यांना फिरण्यास मज्जाव होता. गळ्यात मडके व कमरेला खराटा बांधून दुपारच्या बेळीच त्यांना गावात येण्यास परवानगी होती. सवर्णांची सेवा करणे एवढेच त्यांचे कर्तव्य होते. अत्यंत हीन कामे त्यांच्याकडून करवून घेतली जात. विद्यार्जनाचा अधिकार त्यांना नव्हता. हा समाज अज्ञान अंधकारात पिचत पडलेला होता. सर्व बाजूंनी उपेक्षित जीवन त्यांना जगावे लागत होते, अशा कनिष्ठ वर्गातील लोकांचे अज्ञान, निरक्षरता दूर करण्यासाठी त्यांची गुलामगिरीतून मुक्तता करण्याचे कार्य त्यांनी हातीं घेतले. या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी ग्रंथ, काव्ये अशी उपयुक्त पुस्तकेही लिहिली आहेत. वर्णव्यवस्था हा हिंदू धर्माला लागलेला कलंक आहे. तो दूर करण्याचे कार्य जोतिबांनी हाती घेतले.[११] पिढ्यानपिढ्यांपासून अज्ञान, अंध:कारात खितपत पडलेल्या अस्पृश्यांना महात्मा फुले यांनी ज्ञानाचे दरवाजे उघडून दिले. त्यांच्यात स्वाभिमान निर्माण केला.महात्मा फुले यांनी आपल्या हौदावर पाणी भरण्यासाठी इ.स. १८६८ साली अस्पृश्य लोकांना परवानगी दिली. म. फुले यांचा तो हौद अजूनही 'फुल्यांचा हौद' म्हणून प्रसिध्द आहे. यातून त्यांनी सर्व मानवजातीला समतेचा संदेश दिला.[१२] या कृतीतून त्यांच्या ठाई किती मानवता आणि समता आहे ते दिसून येते.

३. सत्यशोधक समाज : सामाजिक विषमता व दलितांची दुःखे नाहीशी करण्यासाठी, समाजातील भटभिक्षुकांच्या व उच्चवर्णीयांच्या जुलमांचा प्रतिकार करण्यासाठी महात्मा शोतिराव फुले यांनी २८ सप्टेंबर, १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सार्वजनिक सत्य धर्म व गुलामगिरी या दोन पुस्तकात ज्योतिबांनी सत्य शोधक समाजाबद्दलचे आपले विचार मांडले आहेत.

सत्यशोधक समाजाची प्रमुख तत्त्वे अशी होती.

१. ईश्वर एक असून तो सत्यस्वरूप आहे.

२. ईश्वरभक्ती करण्याचा प्रत्येकास अधिकार आहे.

३. ईश्वरभक्तीसाठी मध्यस्थाची जरुरी नाही.

४. मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नसून तो गुणाने श्रेष्ठ ठरतो.

५. कोणताही ग्रंथ (वेद वगैरे) ईश्वरप्रणीत नाही.

६. पुनर्जन्म, कर्मकांड इत्यादी गोष्टी अज्ञानमूलक आहेत.

म. फुले यांनी सत्यशोधक समाजाद्वारे स्त्रिया, अस्पृश्य यांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली. सत्यशोधक समाजाने जमीनदार, सरकारी अधिकारी व ब्राह्मणवर्ग यांच्याकडून पिळली जाणारी सामान्य माणसे, कामगार, स्त्रिया, अस्पृश्य अशा बहुजन समाजाच्या उद्धारासाठी जी सामाजिक क्रांतीची चळवळ सुरू केली, त्या क्रांतीमुळे पुढे राजर्षी शाहू कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी समाजसुधारकांना प्रेरणा मिळाली. [१३]

सत्यशोधक समाजाचे कार्य:

सत्यशोधक समाजाच्या कार्याविषयी 'ज्ञानोदया' मध्ये एक वाचक लिहितो की "ज्ञानोदय होऊन- शिकवणूक लागल्यामुळे मतलबी ग्रंथकरांचा लोप होऊ लागला आहे. आपले हक्क कोणते, परस्परांनी यशोधकाचे कोणत्या नात्याने वागावे, चांगले काय वाईट काय

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

हे लोकांना कळू लागले आहे."[१४] शेतकऱ्यांची सुटका, शिक्षणाचे महत्त्व आदी गोष्टी सांगत असत. सत्यशोधक समाजाने शूद्रातिशूद्र, स्त्रिया, शेतकरी यांची दुर्दशा दूर करण्यासाठी शिक्षणावर भर दिला होता. सत्यशोधक समाजाच्या वतीने शूद्रातिशूद्रांच्या मुलांना शैक्षणिक शिष्यवृत्त्या देण्यासाठी अर्ज मागवून घेतले व १० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. सत्यशोधक समाजाच्या वतीने पुण्याजवळ हडपसर येथे एक शाळा काढली होती. शूद्रांची मुले शाळेत जावीत म्हणून सत्यशोधक समाजाच्या वतीने एक पट्टेवाला ठेवला होता.सत्यशोधक समाजाचा मुख्य लढा धर्मसंस्थेशी व धर्माच्या नावावर स्वतःची उपजीविका करणाऱ्या ब्राह्मणवर्गाच्या विरुद्ध होता. 'ब्राह्मणांचे कसब' ही पुस्तिका व 'शेतकऱ्याचा आसूड'मधील प्रकरण एकमध्ये ब्राह्मण धर्माच्या नावाखाली केव्हा व कोणत्या पद्धतीने शोषण करतात याचे अत्यंत सूक्ष्म व वास्तववादी चित्र रेखाटले आहे. नामधारी ब्राह्मण धर्मविधी करताना जे मंत्र व मंगलाष्टक म्हणतात त्याचा आमच्या लोकांना अर्थ कळत नाही. म्हणून 'सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकांसह सर्व पूजाविधी' ही पुस्तिका तयार करून ती सत्यशोधक समाजाच्या वतीने मोफत वाटली होती. या समाजातर्फे सत्यशोधक विवाहपद्धतीत स्वतः वराने दोन, वधूने दोन व उपस्थितांनी एक मंगलाष्टक म्हणायचे. लग्नविधीसाठी ब्राह्मणास मुळीच बोलावयाचे नाही. अत्यंत कमी खर्चात लग्न लावायचे. शिक्षण फंडास मदत द्यावयाची व अंध, अपंग, अनाथ आदींना मदत करणे वगैरे गोष्टी अभिप्रेत होत्या. खुद्द जोतिबा फुले यांनी या पद्धतीनुसार अनेक लग्ने लावून दिली होती. तसेच ग्यानोबा ससाणे या विधुराचा विवाहही त्यांनी स्वतः लावून दिला होता. कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या होत्या.[१५]

सत्यशोधक समाजान पौरोहित्य, पांडित्य नाका रून समाजाला अंधश्रद्धेतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला, देवाधर्माच्या नावाने त्यांचं होत असलेल्या शोषणातून मुक्त करण्याचा प्रयत्न सतीशोध समाजाच्या माध्यमातून महात्मा ज्योतिबा फुले यांनी केलेला दिसतो.

महात्मा ज्योतिबा फुले यांचे एकूणच विचार आणि कार्य पाहता आपल्याला दिसून येते की महात्मा ज्योतिबा फुले हे मानवतावादी समाज सुधारक होते, गुलामगिरी नावाचे हे पुस्तक त्यांनी अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीतील कृष्णवर्णीय लोकांना समर्पण केलेले होते. महात्मा ज्योतिबा फुले यांनी विविध ग्रंथ लिहून त्या ग्रंथांच्या माध्यमातून समाजातल्या प्रत्येक घटकातील लोकांच्या दुःखावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि या सर्वातून मुक्त होण्याचा एकच मार्ग तो म्हणजे शिक्षण होय हे त्यांनी अतिशय निग्रहाने सांगितले होते. सर्वसामाजिक सुधारणा या शिक्षणाच्या मुळाशी आहेत हे त्यांना माहिती होते आणि म्हणूनच शिक्षणाच्या माध्यमातूनच सामाजिक स्थितीत परिवर्तनाचा प्रयत्न केला. वर्णव्यवस्था व जातिभेद यांबाबत त्यांचे विचार अत्यंत स्पष्ट होते. या दोन्ही बाबी मोडून काढल्या पाहिजेत असेच ते स्पष्ट सांगत. सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक गुलामगिरीवर त्यांनी कठोर टीका केली. त्यांना कोणत्याही प्रकारची गुलामगिरी मान्य नव्हती. त्यांनी बहुजन समाजाला जागृत केले. प्रबोधनाची चळवळ त्यांनी खेड्यापर्यंत पोहोचविली.

समारोप: जोतिबांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी प्रयत्न केले. महाराष्ट्रात त्यांनी शिक्षणाची व अस्पृश्यांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. अस्पृश्यांच्या अन्यायाला वाचा फोडली सामाजिक गुलामगिरीविरुद्ध त्यांनी बंड केले. शेतकऱ्यांची दुःखे त्यांनी वेशीवर टांगली. जी गोष्ट त्यांना पटली तिचा पाठपुरावा त्यांनी केला. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे मोल त्यांनी दिले, परंतु आपल्या कार्यापासून ते अजिबात ढळले नाहीत. त्यांची उक्ती जशी तशीच कृती होती, म्हणूनच त्यांना कर्ते सुधारक म्हणून संबोधले जाते. त्यांनी मूलगामी समाजक्रांतीचा विचार मांडला होता. वरकरणी समाजसुधारणा त्यांना मान्य नव्हत्या. संपूर्ण समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल त्यांना अभिप्रेत होता. त्यांच्या कार्याचे वर्णन करताना धनंजय कीर म्हणतात महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास 'जोतिबांचे नाव जोतो आणि जोती म्हणजे ज्योत त्या ज्योतीने सामाजिक समता, मानवता आणि विवेकवाद यांवर प्रकाश टाकून राष्ट्रास खरा मार्ग दाखविला त्यांचे उपनाव होते फुले आणि फुले म्हणजे फुलाचा धंदा करणारे फुलमाळी या माळ्याने

राष्ट्ररूपी बागेतील सामाजिक एकतेच्या वाढीला विरोध करणारी तणे, बांडगुळे उपटून फुलझाडांची उत्तम जोपासना केली. धनंजय कीर पुढे म्हणतात, "जोतिबांनी स्त्रीजीवनाच्या बंधनांना तडा घालविला. तिला स्वातंत्र्याचा मार्ग चोखाळण्यास समर्थ बनविले. पुरोहित वगनि कनिष्ठ वर्गाच्या मानेभोवती मानसिक गुलामगिरीचे पाश आवळले होते. ते त्यांनी तोडून टाकले. शूद्र व अतिशूद्रांची पिळवणूक करणाऱ्यांचे त्यांनी वाभाडे काढले. शेतकरी सुखी तर देश सुखी हे तत्व त्यांनी लोकांच्या मनावर ठसविले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, " हिंदू समाजातील बहुजन समाजात आत्मप्रत्यय व आत्मावलोकन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे फुले होय."जोतिराव फुले यांनी समाजसुधारणाविषयक केलेल्या कार्याचा गौरव म्हणून मुंबईत ११ मे १८८८ रोजी कोळीवाडा सभागृहात एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभात उपस्थितांनी जोतिरावांना 'महात्मा' ही पदवी प्रदान केली.

संदर्भ ग्रंथ सूची:

१) जी. एल. भिडे , एन डी पाटील - महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास फडके प्रकाशन , कोल्हापूर, तेरावी आवृत्ती, पृ. क्रमांक: ७०

२) शिल्पकार चरित्रकोश खंड १०,आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, प्रकाशक साप्ताहिक विवेक (हिंदुस्तान प्रकाशन संस्था) पृष्ठ क्रमांक: २६९.

३) पूर्वोक्त , -महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास फडके प्रकाशन , कोल्हापूर, तेरावी आवृत्ती, पृ. क्रमांक: ७०.

३) शिल्पकार चरित्रकोश खंड १०, आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, प्रकाशक साप्ताहिक विवेक , पृष्ठ क्रमांक: २६९

४) कित्ता पृष्ठ क्रमांक २७०.

५) संपादक , प्रा. हरी नरके, महात्मा फुले समग्र वाङ मय, महात्मा ज्योतिराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन मुंबई, दुसरी आवृत्ती २०२१ पृष्ठ क्रमांक : २६३.

५) कित्ता पृष्ठ क्रमांक २७१.

६) संपादक , प्रा. हरी नरके, पूर्वोक्त पृष्ठ क्रमांक : २४१.

७) जी. एल. भिडे , एन डी पाटील - महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास फडके प्रकाशन , कोल्हापूर, तेरावी आवृत्ती, पृ. क्रमांक: ७४

८) शिल्पकार चरित्रकोश खंड १०,आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, प्रकाशक साप्ताहिक विवेक (हिंदुस्तान प्रकाशन संस्था)फुले, जोतिराव गोविंद महात्मा फुले स्त्रीशिक्षण, पृष्ठ क्रमांक: २६९.

९) कित्ता पृष्ठ क्रमांक.२६९

१०) संपादक, डॉ. च. वि. जोशी, सत्यशोधक समाज साहित्य आणि विचार, प्रथमावृत्ती २०१०. पृष्ठ क्रमांक १८.

११) जी. एल. भिडे , एन डी पाटील - पूर्वोक्त पृ. क्रमांक: ७५

१२) पूर्वोक्त पृष्ठ क्रमांक: १९.

१३) प्राचार्य य ना कदम. , आधुनिक भारत , खडकी प्रकाशन कोल्हापूर , प्रथमावृत्ती, एप्रिल २००५, पृ. क्रमांक: १९७

१४) प्रदीप वाघमारे, बाबासाहेब कांबळे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, म्हणून प्रकाशन विलेपार्ले मुंबई, ऑगस्ट २०११.पृ. क्रमांक: ४१

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

१५) डॉ. एस एस गाठाळ, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास , कैलास पब्लिकेशन्स ,vऔरंगपुरा, औरंगाबाद , नोव्हेंबर , २०२१. पृ. क्रमांक: १८४.

१६) जी. एल. भिडे , एन डी पाटील - महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास फडके प्रकाशन , कोल्हापूर, तेरावी आवृत्ती, पृ. क्रमांक: ८४.